N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -१)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वर्धा **P.S.(ठाणे):** समुद्रपूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0134 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**25/02/2026 23:19

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिंबधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिंनाक पासून):** 23/02/2026

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिंनाक पर्यंत):** 25/02/2026

**Time From (वेळेपासून):** 10:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:19 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 25/02/2026 **Time (वेळ):** 15:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 031

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 25/02/2026 23:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आलोसे यांचे कक्षात ,तहसिल कार्यालय, समुद्रपुर,वर्धा , 442001

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शा.तर्फे श्रीमती कान्होपात्रा पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वर्धा

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,वर्धा,वर्धा,वर्धा,वर्धा,महाराष्ट्र,442001,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग,वर्धा,वर्धा,वर्धा,वर्धा,महाराष्ट्र,442001,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9922995975

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विद्या ज्ञानेश्वरराव लोखंडे | | | 1. कलोडे दुध डेअरी जवळ,आदर्श नगर, ,हिंगणघाट,हिंगणघाट, हिंगणघाट,वर्धा,महाराष्ट्र,भारत-442001 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विंलबाची कारणे):**

तक्रार देताच

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



CS CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | Realme Narzo कंपनीचा जुना वापरता मोबाईल फोन | 5,000.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | आलोसे यांचे कडुन तक्रारदार यांचे कामाचे संबंधीत कागदपत्रे | 0.00 |
| 3 | कागदपत्रे आणि मुल्यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | तक्रारदार यांचे कडुन आलोसे यांनी दिलेल्या पारित आदेशाची झेराक्स प्रत | 0.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रुपये दराच्या 14 चलनी नोटा | 7,000.00 |
| 5 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | Sandisk कंपनीचे 32 GB चे 4 मेमरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

12,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

हकिकत याप्रमाणे आहे की, तक्रारदार यांचे मौजा लोणार तह.समुद्रपुर, जि.वर्धा येथील शेत सर्वे नं.87 आराजी 2.00 हे.आर. हे शेत तक्रारदार यांचे भासरे यांनी परस्पर नागपुर येथील रामटेके यांना विकल्याचे माहित पडल्याने शेतजमिनीचा फेरफार रोखण्याकरीता तक्रारदार यांनी तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे आक्षेप नोंदविण्या करीता अर्ज दिला होता. सदर अर्जावर तक्रारदार यांनी तहसिलदार समुद्रपुर यांना त्यांचे वकीलामार्फत आपले म्हणने सादर केले होते. तक्रारदार यांचे वादांकीत शेतजमीनीच्या केस मधील संबंधीत व्यक्तींना नोटीस तसेच तक्रारदार यांना त्यांचे बाजुने आदेश पारीत करण्याकरीता आलोसे यांनी 10,000 रूपये लाचेची मागणी केली होती. तक्रारदार हिला लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने तक्रारदार हिने दि. 23.02.2026 रोजी ला.प्र.वि. कार्या. वर्धा येथे आपली लेखी तक्रार दिली असता दि.23.02.2026 रोजी व दि. 25.02.2026 रोजी लाच मागणी व लाचसापळा कार्यवाही केली असता. आलोसे यांनी तडजोडी अंती 7,000/- रूपये लाच रक्कम पंचा समक्ष स्विंकारताना मिळुन आल्याने आलोसे विरूध्द सदरचा गुन्हा नोंद करून पुढील तपासचे कागदपत्रे ला.प्र.वि. वर्धा यांना देण्यात आले.

नक्कल फियाद -ला.प्र.वि. जि. वर्धा.कॅम्प पो.स्टे.समुद्रपुर,जि.वर्धा दिंनाक: 25/02/2026 मी कान्होपात्रा बन्सा, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, वर्धा दिंनाक 23/02/2026 रोजी सकाळी 10.30 वाजता कार्यालयात हजर असताना, एक महिला व एक व्यक्ती लाचलुचपत प्रतिबधक विभाग कार्यालय, वर्धा येथे आले व पोलीस उपअधिक्षक साहेब श्री.साखरकर सर यांनी मला कक्षात बोलावुन सांगीतले की, कक्षात हजर असलेल्या श्रीमती नमिता देवानंद शेळके वय 54 वर्ष व्यवसाय शेती, रा.वाघेडा पो.वायगाव, तह. समुद्रपुर जिल्हा वर्धा. व त्यांचे सोबत असलेला त्यांचा भाचा नामे रोशन अनिल चारभे रा. गड चांदुर तह. कोरपणा जि. चंद्रपुर असे असुन यातील तक्रारदार श्रीमती नमिता शेळके यांची एका लोकसेवका विरूध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे त्यांनी आम्हास सांगुन योग्य ती पुढील कारवाई करण्याच्या सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही दिंनाक 23/02/2026 रोजी सकाळी 10.50 वा. ला.प्र.वि. कार्यालयातील कर्मचा-यांच्या हस्ते शासकीय पंचाना बोलाविले व तक्रारदार यांची दोन्ही शासकीय पंचाना ओळख करून दिली व तक्रारदार यांना एक कोरा कागद व पेन उपलब्ध करून देवुन तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार लिहुन आमचे समक्ष सादर केली असुन सदरची लेखी तक्रार खालीलप्रमाणे आहे.



CamScanner

लेखी तक्रार

लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, वर्धा
दि. 23.02.2026
प्रति,
मा. पोलीस उपअधिक्षक साहेब,
लाचलुचपत प्रतिंबधक विभाग,
वर्धा

विशय:- लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्याबाबत.
अर्जदार:- श्रीमती.नमिता देवानंद शेळके वय 54 वर्ष व्यवसाय शेती रा.वाघेडा पोस्ट वायगाव तह.समुद्रपुर जिल्हा वर्धा. मो.नं.8999686941

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आज रोजी मी माझा भाचा नामे रोशन अनिल चारभे रा.गड चांदुर तह.कोरपणा जिल्हा चंद्रपुर याचेसह ला.प्र.वि.कार्या.वर्धा येथे येवुन माझी लेखी तक्रार देत आहे की, माझे सासरे नामे वामण शेळके यांच्या नावाने मौजा.लोणार तह.समुद्रपुर येथे शेत सर्वे नं.87 आराजी 2.00 हे.आर. जमीन होती व माझे सासरे वामन शेळके हे सन 2009 मध्ये मरण पावले होते. मरणापुर्वी त्यांनी वर नमुद सदरचे शेत हे माझे पती देवानंद शेळके व माझे नावाने मृत्युपत्र बनवुन आमचे नावे केले होते. परंतु माझे मोठे भासरे नामे राजकुमार शेळके यांनी सन 2009 मध्ये खोटे मृत्युपत्र बनवुन सदरची शेतजमिन त्यांनी स्वतःचे नावाने करून घेतली होती. म्हणुन मी सदर वादांकीत जमिनी बाबत मा.न्यायालय केस टाकली होती व सध्या हायकोर्ट नागपुर येथे सदर केसचा निकाल प्रलंबीत आहे.

परंतु माझे मोठे भासरे राजकुमार शेळके यांनी सदरचे वादांकीत शेत हे कैलाश रामटेके रा.नागपुर यांना विकल्याचे आम्हाला समजल्याने मी सदर वादांकीत शेतजमिनीचा फेरफार रोखन्या करीता दि.24.11.2025 रोजी तलाठी साहेब, मौजा लोणार तह.समुद्रपुर यांचे नावे लेखी अर्ज केला होता. त्या अर्जावर तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे आक्षेप नोंदविण्या करीता दि.23.12.2025 रोजी हजर राहण्या बाबतची नोटीस मला प्राप्त झाल्याने मी दि. 23.12.2025 रोजी तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे हजर राहीले तेथे नायब तहसिलदार यांच्या कार्यालयातील नोटीस काढण-या महिला कर्मचारी महसुल सहाय्यक (प्रस्तुतकार) श्रीमती. लोखंडे मॅडम यांनी मला सदर केसमध्ये पुढील तारीख देण्यात आली असल्याचे सांगीतले व त्यानुसार पुढील तारखेवर मी माझे वकीला मार्फत माझे म्हणणे तहसिल कार्यालय,समुद्रपुर येथे सादर केले होते.

दि.16.2.2026 रोजी मी माझे कामासंबंधी विचारपुस करण्या करीता तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे गेली व नायब तहसिलदार यांच्या कार्यालयात काम करणा-या महसुल सहाय्यक (प्रस्तुतकार) कर्मचारी श्रीमती लोखंडे मॅडम यांना भेटले असता श्रीमती लोखंडे मॅडम यांनी मला आमच्या मौजा लोणार तह.समुद्रपुर येथील शेत सर्वे नं. 87 आराजी 2.00 हे.आर. या वादांकीत शेतजमीनीच्या केस मधील संबंधीत व्यक्तींना नोटीस तसेच माझ्या बाजुने आदेश पारीत करण्या करीता मला 10,000 रूपये लाचेची मागणी केली होती. परंतु त्यावेळी माझेकडे पैसे नसल्याने मी गावाकडे परत गेले. त्यानंतर दि.20.02.2026 रोजी लोखंडे मॅडम यांनी मला त्यांचे मोबाईलवरून माझे मोबाईलवर फोन करून मला 10,000 रूपये घेवुन दि.23.02.2026 रोजी त्यांचे कार्यालयात बोलावीले होते. परंतु मला लोखंडे मॅडम यांना लाच रक्कम 10,000/- रूपये देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी आज रोजी ला.प्र.वि.कार्यालय वर्धा येथे माझा भाचा रोशन चारभे याच्यासोबत येवुन माझी लेखी तक्रार देत आहे. माझे श्रीमती लोखंडे मॅडम यांच्या सोबत कोणतेही पुर्ववैमनस्य नाही किंवा पैशाची देवान घेवान झालेली नाही.

श्रीमती. लोखंडे मॅडम यांच्यावर कार्यवाही होणेस माझी लेखी तक्रार मी देत आहे. यासोबतच सदर वादांकीत शेतजमिनीचा सातबारा उतारा प्रत, मृत्युपत्र,नमुणा 9 चे पत्र, फेरफार रोखणे संबंधी तलाठी साहेब मौजा लोणार तह. समुद्रपुर यांचे नावे लीहीलेला लेखी अर्ज असे सर्व कागदपत्र सोबत जोडत आहे. ठिकाण - लाचलुचपत प्रतिंबधक विभाग कार्यालय, वर्धा सही मराठीत, नमिता देवानंद शेळके दि.23.02.2026 . याप्रमाणे तक्रारदार यांची लेखी तक्रार आहे. अशी तक्रारदार यांनी त्यांची लेखी तक्रार दिली. सदरची तक्रार आम्ही वाचुन दोन्ही पंचाना वाचण्यास दिली. दोन्ही पंचानी सदरची तक्रार वाचुन तक्रारदार यांचे तक्रारीवर व तक्रारदार यांनी सादर केलेले कागदपत्रांवर स्वाक्षरी केली. तसेच आम्ही सुध्दा स्वाक्षरी केली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे कडुन सापळा कार्यवाही मध्ये वापरण्यात येणारी लाच रक्कम 10,000/- रुपये आमचे समक्ष हजर केल्यानंतर 500/- रूपये दराच्या 20 नोटांना हेड मोहरर मंगेश गंधे यांच्याकडुन एक नविन



CamScanner

सिलबद अॅन्थ्रासिनची बॉटलीचे सिल पो.नि. कान्होपात्रा बन्सा यांनी काढुन सापळा पार्टीतील सदस्य पो. अंमलदार मनिश मसराम यांच्या हस्ते दोन्ही पंचाचे समक्ष तक्रारदार यांना अॅन्थ्रासिन पावडरच्या गुणधर्माविषयी माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले व वरील 500/- रूपये दराच्या 20 नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावुन सदर नोटा एका को-या लिफाफ्यामध्ये ठेवुन सदरचा लिफाफा आम्ही आमचे ताब्यात घेतला.
त्यानंतर आम्ही दि. 23/02/2026 रोजी तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार श्रीमती विद्या लोखंडे यांची लाचमागणीबाबत पडताळणी करणे असल्याने आम्ही दोन्ही शासकीय पंच व सापळा पथक असे शासकीय वाहन क्र. एमएच-32-ऐ.एस-4047 ने 12.10 वा. कार्यालयातुन रवाना झालो व तक्रारदार हे त्यांचा भाचा रोशन चारभे यांचे जवळील मोटार सायकल क्र. एम.एच. 34 बी.एक्स 9918 ने आमचे वाहणाचे समोर रवाना झाले त्यानंतर वेळ 13.10 वा. चे दरम्यान शासकीय वाहन रोडचे डाव्या बाजुस, रोडचे खाली उतरवुन आम्ही समुद्रपूर ते वर्धा रोडवरील समुद्रपूर जवळ असलेले कॅनल चे बाजुला असलेले ठाकरे यांच्या शेताजवळ थांबुन असता काही वेळाने वेळ 13.20 वा. आमचे मागोमाग असलेले तक्रारदार व त्यांचा भाचा त्याच्या जवळील खाजगी दुचाकी वाहनाने आमचे जवळ येवुन थांबले.
यानंतर आम्ही, तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार श्रीमती लोखंडे, महसुल सहाय्यक (प्रस्तुतकार) तहसिल कार्यालय समुद्रपुर यांचे लाच मागणी बाबत पडताळणी करणे असल्याने तक्रारदार व दोन्ही पंच यांना व्हॉईस रेकार्डर यांचे गुनधर्माबाबत माहिती दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गैरअर्जदार श्रीमती लोखंडे यांची कोठे भेट होईल? याबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी गैरअर्जदार लोखंडे ही त्यांचे तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे भेटतील असे सांगीतले. त्यावरून आम्ही तक्रारदार, व पंच क्र. 01 यांना तक्रारदार यांच्या भाच्या जवळील मोटार सायकल ने गै.अ. यांचे भेटीस रवाना करण्याचा निणय घेवुन तक्रारदार यांना गै.अ. यांनी खरच लाच मागणी केली किंवा कसे? याबाबत पडताळणी करण्याचा निंणय घेवुन आम्ही ट्रॅप बॅगमधील 32 जीबी क्षमतेचे सॅनडीस्क कंपनीचे मेमरी कार्ड बाहेर काढले असता, त्याचा सिरीयल क्रमांक 52010NAZN13Q असा आहे. सदरचे मेमरी कार्ड व्हाॅईस
रेकाॅ
ड
रमध्ये टाकुन मेमरी कार्डमध्ये कोणत्याही प्रकारची रेकार्डींग फाईल नसल्याची पंच व तक्रारदार यांची खात्री करून वेळ 13.3
यानंतर आम्ही सदर संभाषणाची नमुद फाईल क्रमांक 260223_1338 संग्रहीत असलेले व्हाईस रेकार्डर मधिल सॅनडिस्क कंपनीचे 32 जि.बी क्षमतेचे मेमरी कार्ड व्हाईस रेकार्डरचे बाहेर काढून एका प्लास्टीक पाउच मध्ये टाकून सदर प्लास्टीक पाउच एका कागदी लिफाफामध्ये टाकुन ताब्यात घेवुन ट्रॅपबॅगमध्ये ठेवुन दिले.
यानंतर आम्ही, गै.अ. श्रीमती लोखंडे व तक्रारदार यांच्यात स्पश्ट लाचेची मागणी न झाल्याने पर्यवेक्षण अधिकारी श्री. साखरकर पोलीस उपअधिक्षक साहेब व दोन्ही पंच यांनी सर्वानुमते पुन्हाः लाचमागणी पडताळणी करण्याचा निंणय घेतला.
गैरअर्जदार श्रीमती लोखंडे यांचे लाच मागणी बाबत पुन्हा पडताळणी करणे असल्याने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हाॅईस रेकार्डर यांचे गुनधर्माबाबत पुनःच्छ एकदा माहिती दिली. व आमचे सुचनेवरून पंच क्र. 1 यांनी तक्रारदार हिची सापळा पडताळणीपुर्वीची अंगझडती घेतली.
यानंतर आम्ही ट्रॅपबॅगमधुन सोनी कंपनीचे डिजिटल व्हाईस रेकार्डर व सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे पॅकींग मधील एक नविन मेमरीकार्ड बाहेर काढले. ज्याचा सिरीअल नं. 52010NAZN13Q असा आहे. यानंतर दोन्ही पंचाना व्हाईस रेकार्डचे गुणधर्माबाबत पुन्हाः माहिती दिली व 32 जिबी क्षमतेचे नविन मेमरी कार्ड व्हाईस रेकार्डरमध्ये टाकुन व्हाईस रेकार्डर 15.38 वा. रेकार्डर रेकार्डींग मोडवर सुरु करून पंच क्र. 1 यांनी त्यांचे आवाजात संभाशण केले. व्हाॅईस
रेकाॅ
ड
र तक्रारदार यांचे गळ्यात धाग्याचे सहाय्याने लटकवून ब्लाऊजचे आत कोणासही दिसणार नाही अश्या पध्दतीने लपवुन ठेवले
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार,पंच क्र. 1 असे तक्रारदार यांच्या भाच्याजवळील दुचाकी वाहणाने आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी वेळ 16.02 वा. परत आले. यानंतर आम्ही तक्रारदार यांचे जवळ असलेले व्हाईस रेकार्डर आमचे ताब्यात घेवुन पंच क्र. 1 यांनी व्हाईस रेकार्डर पुर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे 16.03 वा. बंद केली असता स्क्रिनवर फाईल क्र.260223_1538 तयार झाल्याचे आम्हास व दोन्ही पंचाना दिसुन आले.
त्यानंतर पंच क्र. 1 यांना आमचे जवळून रवाना झाल्यापासून परत येईपर्यंतचा घटनाक्रम कथन करण्यास पंच क्रमांक 2 चे समक्ष सांगीतले असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार असे जावुन गै.अ.श्रीमती लोखंडे, तहसिल



CamScanner

कार्यालय समुद्रपुर,येथे गेली असता तेथे गै.अ. हे त्यांचे कार्यालयामध्ये हजर नव्हत्या तेव्हा तक्रारदार यांनी तेथील कर्मचारी यांना गै.अ. यांच्या बाबत विचारपुस केली असता तेव्हा तेथील कर्मचारी यांनी सांगितले की माहीत नाही फोन लावा असे म्हंटल्यावर तक्रारदार व मी बाहेर येवुन तक्रारदार यांनी स्वतःच्या फोनवरून गै.अ. यांच्या फोन वर फोन करून फोन स्पिकारवर केला व बोलणी केली असता गै.अ. यांनी तक्रारदार यांना मी आता बाहेर आली असल्याबाबत सांगीतल्याने मी व तक्रारदार असे तहसिल कार्यालयाचे बाहेर येवुन तक्रारदार यांच्या भाच्याच्या दुचाकीवाहणाने आपण थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. याप्रमाणे पंच क्र. 1 यांनी घटनाक्रम कथन केला. यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे जवळून रवाना झाल्यापासून परत येईपर्यंतचा घटनाक्रम कथन करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी पंच क्र. 1 यांनी कथन केलेल्या घटनाक्रमास दुजोरा दिला.

यानंतर आम्ही सदर संभाशणाची नमुद फाईल क्रमांक 260223_1538 संग्रहीत असलेले व्हाईस रेकार्डर मधिल सॅनडिस्क कंपनीचे 32 जि.बी क्षमतेचे मेमरी कार्ड व्हाईस रेकार्डरचे बाहेर काढून एका प्लास्टीक पाउच मध्ये टाकून सदर प्लास्टीक पाउच एका कागदी लिफाफामध्ये टाकुन ताब्यात घेवुन ट्रॅपबॅगमध्ये ठेवुन दिले.

दिनाक 23/02/2026 रोजी झालेल्या कार्यवाही दरम्यान गै.अ.यांची तक्रारदार यांचेकडुन स्पष्ट लाच मागणी नसल्याचे तक्रारदार व गै.अ. यांचे मध्ये झालेल्या संभाषणावरुन आमचे तसेच दोन्ही पंच व पर्यवेक्षण अधिकारी यांचे निंदशनास आल्याने आम्ही दिनाक 23/02/2026 रोजीची कार्यवाही तात्पुरती स्थगीत ठेवण्याचा निंणय दोन्ही पंचासमक्ष घेतला व त्याबाबत तक्रारदार यांना सविस्तर अवगत करून दिले. यानंतर तक्रारदार यांना सुचना दिल्या की, गै.अ. यांनी आपणास लाचे संबधाने पुन्हा गै.अ. यांनी संपर्क केल्यास तात्काळ आमचेशी संपर्क करावा तसेच तक्रारदार यांचा भाचा यांना सुध्दा आज झालेल्या कार्यवाहीची कोठेही वाच्छता न करण्याचा सुचना दिल्या व तक्रारदार व त्यांचा भाचा दोघांनाही आजच्या कारवाईचे गोपनियते बाबत योग्य सुचना देवुन तक्रारदार यांना भाच्या जवळ असलेल्या दुचाकी वाहनाने त्यांच्या गावी रवाना करण्यात आले.

यानंतर आम्ही सध्या थांबुन असलेल्या ठिकाणावरुन आम्ही, पर्यवेक्षण अधिकारी, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील सदस्य असे शासकीय वाहन क्र. एम.एच. 32 ए.एस. 4047 ने वेळ 16.45 वा. रवाना होवुन ला.प्र.वि. कार्यालय वर्धा येथे 17.30. वा. पोहचुन तक्रारदार व गै.अ यांचे भेटीतील संभाषण संग्रहीत असलेले मेमरीकार्ड मधील रेकार्डेड संभाशणाचे संभाशणाची स्क्रिप्ट तयार करून त्यानंतर सदर फाईलची हॅश व्हॅल्यु काढुन झालेल्या कार्यवाहीचा पंचनामा कार्यवाही ला.प्र.वि. कार्यालय वर्धा करण्यात आला व सदरचे हॅश व्हॅल्यु प्रमाणपत्र या पंचनाम्यासह संलग्न करण्यात आले. तसेच सापळा पार्टीतील सदस्य तसेच दोन्ही पंचाना गोपनियता राखण्याबाबत सुचना देण्यात आल्या.

दिंनाक 24.02.2026 रोजी पोलीस उपअधिक्षक साखरकर साहेब यांनी आम्हास कार्यालयात हजर असतांना माहिती दिली कि, तक्रारदार यांना गै.अ. यांनी फोन करुन त्यांना दिंनाक 25/02/2026 रोजी तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे बोलाविले आहे. त्यावरुन आम्ही दोन्ही पंचांना दिंनाक 25/02/2026 रोजी सकाळी 10/30 वाजता हजर राहणे बाबत सुचना केल्यावरुन दिंनाक 25.02.2026 चे सकाळी 10.30 वा. दोन्ही पंच ला.प्र.वि. कार्यालयात हजर आले.

आज रोजी दिंनाक 23/02/2026 रोजी तक्रारदार यांनी तक्रारीत नमुद केल्याप्रमाणे गैरअर्जदार श्रीमती विद्या लोखंडे यांची लाचमागणीबाबत पडताळणी करणे असल्याने आम्ही दोन्ही शासकीय पंच व सापळा पथक असे शासकीय वाहन क्र. एमएच-32-ऐ.एस-4047 ने 11.00 वा. कार्यालयातुन रवाना झालो त्यानंतर पर्यवेक्षण अधिकारी यांना तक्रारदार यांनी फोनव्दारे माहिती दिल्या प्रमाणे आम्ही समुद्रपुर येथील कृशी उत्पन्न बाजार समिती येथील बंद पडलेल्या गोडावुन जवळ 12.05 वाजता पोहोचलो. तेथे तक्रारदार हया त्यांचे भाच्या सह त्यांचे भाच्या जवळील मोटार सायकल ने तेथे हजर होत्या.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांचे सोबत झालेल्या लाच मागणी पडताळणी संभाशणामध्ये गै.अ. यांचे कडुन स्पश्ट लाच मागणी नसल्याने आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांचे भेटीस त्यांचे तहसिल कार्यालय समुद्रपुर येथे जावुन गै.अ. यांची तक्रारदार यांना खरोखरच लाच मागणी आहे किंवा कसे ? या पुन्हा एकदा पडताळणी करण्याचा दोन्ही पंच व पर्यवेक्षण अधिकारी यांचे समक्ष निंणय घेतला.

त्यानंतर आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हाईस रेकार्डर यांचे गुनधर्माबाबत पुन्हा एकादा माहिती देवुन आमचे सुचनेवरून पंच क्र. 1 यांनी तक्रारदार हिची सापळा पडताळणीपुर्वीची अंगझडती घेतली.

यानंतर आम्ही ट्रॅपबॅगमधुन सोनी कंपनीचे डिजिटल व्हाईस रेकार्डर व सॅनडिस्क कंपनीचे 32 जीबी क्षमतेचे पॅकींग मधील एक नविन मेमरीकार्ड बाहेर काढले, ज्याचा सिरीअल नं. 5203DREHF1A3 असा आहे. यानंतर दोन्ही पंचाना व्हाईस रेकार्डचे गुणधर्माबाबत पुन्हाः एकदा माहिती दिली व 32 जिबी क्षमतेचे नविन मेमरी कार्ड व्हाईस रेकार्डरमध्ये टाकुन व्हाईस रेकार्डर 12.36 वा. रेकार्डर रेकार्डींग मोडवर सुरु करून पंच क्र. 1 यांनी त्यांचे

आवाजात संभाशण केले. व्हाईस रेकार्डर तक्रारदार यांचे गळ्यात महिला पोलीस अंमलदार यांच्या हस्ते धाग्याचे सहाय्याने लटकवून ब्लाऊजचे आत कोणासही दिसणार नाही अश्या पध्दतीने लपवुन ठेवले व तक्रारदार यांना पंच नं. 1 यांचेसह तक्रारदार यांचा भाचा रोशन चारभे यांचेसह मोटार सायकलने गै.अ.यांची भेट घेण्याकरीता तहसिल कार्यालय समुद्रपूर यथे रवाना केले.

त्यानंतर काही वेळाने तक्रारदार,पंच क्र. 1 असे तक्रारदार यांच्या भाच्याजवळील दुचाकी वाहणाने आम्ही थांबुन असलेल्या ठिकाणी वेळ 13.19 वा. परत आले. यानंतर आम्ही तक्रारदार यांचे जवळ असलेले व्हाईस रेकार्डर आमचे ताब्यात घेवुन पंच क्र. 1 यांनी व्हाईस रेकार्डर पुर्वी दिलेल्या सुचनेप्रमाणे 13.20 वा. बंद केली असता स्क्रिनवर फाईल क्र. 260225_1236 तयार झाल्याचे आम्हास व दोन्ही पंचाना दिसुन आले.

त्यानंतर पंच क्र. 1 यांना आमचे जवळून रवाना झाल्यापासून परत येईपर्यंतचा घटनाक्रम कथन करण्यास पंच क्रमांक 2 चे समक्ष सांगीतले असता त्यांनी सांगीतले की, मी व तक्रारदार असे जावुन गै.अ.श्रीमती लोखंडे, तहसिल कार्यालय समुद्रपुर,येथे गेलो. तक्रारदार यांचे गै.अ. यांचे सोबत त्यांच्या कामाच्या संबंधाने बालणी झाली दरम्यान गै. अ. यांनी तक्रारदार यांच्या शेतजमीनीच्या केस मधील संबंधीत व्यक्तींना नोटीस काढुन देण्याकरीता तसेच सदर वादांकीत शेत जमिणीचा आदेश पारीत करण्याकरीता 7,000 रूपये लाचेची मागणी

त्यानंतर मी व तक्रारदार असे तहसिल कार्यालयाचे बाहेर येवुन तक्रारदार यांच्या भाच्याच्या दुचाकीवाहणाने आपण थांबुन असलेल्या ठिकाणी परत आलो. याप्रमाणे पंच क्र. 1 यांनी घटनाक्रम कथन केला. यानंतर आम्ही तक्रारदार यांना आमचे जवळून रवाना झाल्यापासून परत येईपर्यंतचा घटनाक्रम कथन करण्यास सांगीतले असता तक्रारदार यांनी पंच क्र. 1 यांनी कथन केलेल्या घटनाक्रमास दुजोरा दिला.

त्यानंतर तक्रारदार व गै.अ. यांचे मध्ये झालेले संभाशण आम्ही एॆकले तसेच पर्यवेक्षण अधिकारी तसेच पंच क्र.2 यांना सुध्दा एॆकण्यास दिले असता गै.अ. यांनी तक्रारदार यांना त्यांचे मौजा लोणार तह. समुद्रपुर येथील शेत सर्वे नं. 87 आराजी 2.00 हे. आर. या वादांकीत शेतजमीनीच्या केस मधील संबंधीत व्यक्तींना नोटीस काढुन देण्याकरीता तसेच सदर वादांकीत शेत जमिणीचा आदेश पारीत करण्याकरीता 7,000 रूपये लाचेची मागणी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी तक्रारदार यांचेवर प्रभाव टाकुन, तक्रारदार यांचे प्रलंबित काम आलोसे यांचे अधिकारक्षेत्रात नसतांना सुध्दा ते असल्याचे तक्रारदार यांना भासवुन तक्रारदार यांचे कडुन 7000/- रुपये लाच रक्कम स्विकारण्याची तयारी असल्याचे संभाशणावरुन दिसुन आले. व्हॉईस रेकार्डर मधील संभाशणाची सविस्तर स्क्रिप्ट तयार करून पंचनाम्यामध्ये नमुद करण्यात आली आहे.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी 7,000/- रूपयाची लाच रक्कमेची मागणी केली असुन तक्रारदार यांनी तक्रारीवेळी आमचे समक्ष हजर केलेले 10,000/- रूपये पैकी त्यांना 7000 रुपये 500/- रुपये दराच्या 14 चलणी नोटा पंचनामा दरम्यान पंच क्र. 01 यांना वाचलेल्या व पंच क्र. 02 यांनी एका कागदावर सदर नोटांचे क्रमांक नमुद केलेल्या नोटांपैकी अ.क्र. 1 ते 14 नोटा सापळा कार्यवाही मध्ये वापरण्याचा आम्ही दोन्ही पंचांचे समक्ष निर्णय घेतला. उर्वरीत अ.क्र. 15 ते 20 अष्या 500 रुपये दराच्या 6 नोटा तक्रारदार यांना ताबापावती प्रमाणे परत देण्याची तजविज ठेवण्यात आली.

त्यानंतर आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी मागणी प्रमाणे अॅन्थ्रासिन पावडर लावुन असलेली लाच रक्कम 7,000/- रूपये ज्यात 500/- रूपये दराच्या 14 चलनी नोटा पो.शि. मनिश मसराम यांना लिफाफ्यामधुन बाहेर काढुन तक्रारदार यांचे जवळील लेडीज पर्सच्या आतमध्ये ठेवुन देण्याच्या सुचना दिल्याने पो.शि. मनिष मसराम यांनी तक्रारदार यांचे जवळील लेडीज पर्सच्या आतमध्ये अलगद ठेवुन दिल्या व पोशि मनिश मसराम यांना सापळा पार्टीतुन वघळुन समुद्रपुर जवळील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गोडावुन जवळच थांबुन राहण्याबाबत सुचना दिल्या. आम्ही तक्रारदार यांना गै.अ. यांनी लाच रक्कम स्विकारल्यानतर तहसिल कार्यालय समुद्रपुर चे बाहेर येवुन त्यांचे डोळयाचा चश्मा डाव्या हाताने काढुन नियोजित इशारा करणे बाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही ट्रॅप बॅगमधुन 32 जीबी क्षमतेचे सॅनडीस्क कंपनीचे मेमरी कार्ड बाहेर काढले असता, त्याचा सिरीयल क्रमांक 5203DREHF1A5 असा आहे. सदरचे मेमरी कार्ड व्हाईस रेकार्डरमध्ये टाकुन मेमरी कार्डमध्ये कोणत्याही प्रकारची रेकार्डींग फाईल नसल्याची पंच व तक्रारदार यांची खात्री करून व्हाईस रेकार्डर वेळ 13.56 वा. पंच क्र. 01 यांचे आवाजात सुरू करून पंच क्र. 01 यांचेसह तक्रारदार यांना तक्रारदार यांच्या भाच्यासह त्यांचे जवळील मोटार सायकल ने रवाना करण्यात आले. त्यांचे मागोमाग आम्ही, पंच क्र. 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने रवाना झालो. तक्रारदार व पंच क्र. 1 असे बसुन असलेली तक्रारदार यांच्या भाच्याची मोटार सायकल ही समुद्रपुर तहसिल कार्यालयाचे समोर उभी करुन तक्रारदार व पंच क्र. 1 असे तहसिल कार्यालयाच्या आत गेल्या व तक्रारदार यांचा भाचा तहसिल कार्यालयाचे बाहेर त्यांचे मोटार सायकल जवळ उभे होते. आम्ही सुध्दा कार्यालयाचे जवळजवळ कोणालाही संशय येणार नाही, अशा प्रकारे आजुबाजुला तक्रारदार यांच्या नियोजीत ईशा-याची वाट



CamScanner

पाहत थांबुन राहलो. त्यानंतर तक्रारदार यांनी वेळ 14.15 वा. तक्रारदार यांनी त्यांचे डोळ्याचा चश्मा त्यांचे डाव्या हाताने काढुन नियोजित ईशारा दिल्याने आम्ही, तसेच पंच क्र. 02 व सापळा पार्टीतील सदस्य असे गै.अ. यांचे तहसिल कार्यालय समुद्रपुर येथील गै.अ. बसुन असलेल्या खोलीत जावुन गै.अ. यांना आमचे ओळखपत्र दाखवुन त्यांना आमचा परिचय देवुन सर्वासमक्ष पंच क्र. 01 यांना विचारणा केली की, लाच रक्कम कोणी घेतली ? व कोठे ठेवली? तेव्हा पंच क्र. 01 यंानी एका महिलेकडे बोट दोखवुन लाच रक्कम यांनी स्विकारून त्यांनी त्यांचे टेबलचे खाली टाकली असल्याचे सांगीतल्याने आम्ही गैरअर्जदार लोखंडे यांना महिला अंमलदार यांच्या मदतीने ताब्यात घेवुन पंच क्र. 01 यांना दिलेल्या सुचनेवरून व्हाईस रेकार्डर वेळ 14.19 वा. बंद करण्यात आले. त्यावेळी व्हाईस रेकार्डरचे स्क्रिनवर फाईल क्र. 260225_1356 तयार झाल्याचे आम्हाला दिसले. त्यानंतर आम्ही गैरअर्जदार यास त्यांचे नाव, पद व पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांचे नाव श्रीमती विद्या ज्ञानेष्वरराव लोखंडे, वय 55 वर्ष, पद - महसुल सहायक (प्रस्तुतकार), तहसिल कार्यालय समुद्रपुर जिल्हा वर्धा वर्ग - 3, रा. आदर्श नगर, कलोडे दुध डेअरी जवळ, हिंगणघाट जिल्हा वर्धा असे सांगीतले. त्यानंतर आम्ही पंच क्र. 01 यांना दिलेल्या सुचनेवरून पंच क्र. 01 यांनी गै.अ. यांची अंगझडती घेतली. गै.अ. यांच्या अंगझडतीमध्ये कोणत्याही प्रकारची संशयास्पद चिजवस्तु मिळुन आली नाही. त्यांनतर गै.अ. यांनी तक्रारदार यांचे कडुन लाच रक्कम स्विकारुन त्यांचे टेबलचे खाली टाकुन दिल्याने सदरची लाच रक्कम आम्ही पंच क्र. 2 यांना त्यांचे ताब्यात ठेवण्याबाबत सांगीतले. सदरची लाच रक्कम सापळा कार्यवाहीमध्ये वापरण्यात आलेली तिच आहे का? याबाबत सदर नोटांचे क्रमांक पंच क्र. 02 यांनी सापळा कार्यवाही अगोदर एका को-या कागदावर लिहुन ठेवलेल्या नोटांचे क्रमांक व गै.अ. यांच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेल्या नोटांचे क्रमांकाची पंचासमक्ष पडताळणी केली असता, सापळा कार्यवाहीत वापरण्यात आलेली लाच रक्कम ही तीच असल्याने पंच क्र. 02 यांच्या ताब्यात तात्पुरती ठेवुन देण्यात आली.

त्यानंतर आम्ही सापळा पार्टीतील सदस्यांचे मदतीने काळ्या रंगाचे कापडाचे आवरण धरून साधारण आंधार केला व अल्ट्राव्हॅायलेट लॅम्प सुरु करुन त्याचा प्रकाश आळीपाळीने आमचे, पंच क्र 1 व पर्यवेक्षण अधिकारी साखरकर साहेब, सापळा पार्टीतील महिला पोलीस अंमलदार राखी फुलमाळी, पोहवा सचिन गाढवे, पोशि प्रशात मानमोडे यांचे हाताचे पंजावर एक-एक करुन दोन्ही बाजुने तसेच कपडयावर पाडला असता कोणतीही चकाकी दिसुन आली नाही. हि बाब आम्ही गै.अ. श्रीमती लोखंडे यांचे निंदषनास आणुन दिली.

यानंतर स्टाफचे मदतीने काळ्या रंगाचे कापडाचे आवरण धरून आम्ही वरनमुद नोटांवर अॅल्ट्राव्हॅायलेट लॅम्पचा प्रकाश एक एक करुन सर्व नोटांचे दोन्ही बाजूंवर टाकला असता नोटांवर अॅथ्रासिन पावडरची रेघ असलेल्या ठिकाणी निळसर पांढ-या रंगाची चकाकी दिसुन आली. यानंतर सदर लाच रकमेच्या नोटा आम्ही पंच क्र. 2 यांचे ताब्यात ठेवल्या.

त्यानंतर आम्ही गै.अ. यांचे हातावर काळा कापडाचे आवरण सापळा पार्टीचे मदतीने पकडुन अल्ट्रा व्हायलेट लॅम्पचा प्रकाश पाडला असता, गैरअर्जदार यांचे दोन्ही हाताचे बोटावर निळसर पांढ-या रंगाचे चकाकी दिसुन आल्याने पंच क्र. 01 व तक्रारदार यांनी खात्री केली.

त्यानंतर गै.अ. यांचे टेबलवर ठेवुन असलेल्या realme ui NARZO N65 5G कंपनीचा जुना वापरता ज्यात अेअरटेल कंपनीचे सिंमकाड मो.क्रमांक 8608934898 असा असुन किंमत अंदाजे 5000/- रुपये, तक्रारदार यांनी गै.अ. यांचे कडुन स्विकारलेली लाच रक्कम 7000/- रुपये, तसेच तक्रारदार यांचे कामाच्या संबंधाने गै.अ. यांचे टेबलवरील कागदपत्रे, तक्रारदार यांच्या कडुन गै.अ. यांनी दिलेल्या दिनाक 10 फेब्रुवारी 2026 आदेशाची प्रत, दिंनाक 23/02/2026 रोजी लाच मागणी पडताळणी करीता वापरण्यात आलेले 2 मेमरी कार्ड व दिंनाक 25/02/2026 रोजी लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही करीता वापरण्यात आलेले एकुण 02 मेमरी कार्ड असे सदर गुन्हयात सविस्तर जप्तीपत्रक तयार करून जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आले आहे.

तरी आरोपी महिला लोकसेवक श्रीमती विद्या ज्ञानेश्वरराव लोखंडे, वय 55 वर्ष, पद - महसुल सहायक (प्रस्तुतकार), तहसिल कार्यालय समुद्रपुर जिल्हा वर्धा वर्ग - 3, रा. आदर्श नगर, कलोडे दुध डेअरी जवळ, हिंगणघाट जिल्हा वर्धा यांनी तक्रारदार यांना त्यांचे मौजा लोणार तह. समुद्रपुर येथील शेत सर्वे नं. 87 आराजी 2.00 हे. आर. या वादांकीत शेतजमीनीच्या केस मधील संबंधीत व्यक्तींना नोटीस काढुन देण्याकरीता तसेच सदर वादांकीत शेत जमिणीचा आदेश पारीत करण्याकरीता तसेज आदेशाची प्रत तक्रारदार हिला देण्याकरीता 7,000 रूपये लाचेची मागणी स्वतःचे आर्थिक फायदयासाठी तक्रारदार यांचेवर प्रभाव टाकुन, तक्रारदार यांचे प्रलंबित काम आलोसे यांचे अधिकारक्षेत्रात नसतांना सुध्दा ते आलोेसे याचे अधिकार शेत्रात असल्याचे तक्रारदार यांना भासवुन तक्रारदार यांचे कडुन 7000/- रुपये लाच रक्कम गैरअर्जदार यांचे तहसिल कार्यालय समुद्रपुर येथील दालणामध्ये पंच क्र. 1 यांचे समक्ष स्विकारताना रंगेहाथ मिळुन आल्याने भ्रश्टाचार प्रतिंबधक अधिनियम-1988 चे कलम 7अ अंतर्गत गुन्हा केल्याने माझी त्यांचेविरुध्द शासन तर्फे कायदेशीर फिंयाद आहे.



CamScanner

समक्ष

(कोन्होपात्रा बन्सा) पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वर्धा

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

RAVINDRA MAHADEVRAO REWATKAR(SI (Sub-Inspector)) / 14601000445ORMRM8201R **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) **.**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

25/2/2026

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

26/2/26

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** RAVINDRA MAHADE
**Rank(पद):** SI (Sub-Inspector)
**No.(नं.):** 146010004450RMRM82

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्य ा खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



CamScanner